दुष्काळाच्या संकटात मच्छीमार बांधवांच्या पाठीशी आ. सुधीर मुनगंटीवार; आर्थिक मदत व तलावभाडे माफीसाठी मुख्यमंत्र्यांकडे मागणी!

मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस आणि मत्स्यव्यवसाय मंत्री नितेश राणे यांना पत्र; बाधित मच्छीमार सहकारी संस्था व नोंदणीकृत सदस्यांना विशेष आर्थिक मदत देण्याची मागणी

तलावांतील पाणीसाठा घटल्याने मत्स्यव्यवसाय संकटात; बोटुकलीवरील खर्चाची भरपाई आणि चालू वर्षाचे तलावभाडे माफ करण्यासाठी ठोस निर्णय घेण्याचे आवाहन

चंद्रपूर : दुष्काळसदृश परिस्थितीचा फटका केवळ शेतीला नव्हे, तर मत्स्यव्यवसायावर अवलंबून असलेल्या कुटुंबांनाही बसत आहे. तलावांमधील पाणीसाठा घटल्याने माशांचे संगोपन आणि उत्पादन प्रभावित झाले असून, मच्छीमार सहकारी संस्था व त्यांच्या नोंदणीकृत सदस्यांसमोर आर्थिक संकट उभे ठाकले आहे. या संकटात मत्स्यव्यवसाय बांधवांना दिलासा मिळावा आणि त्यांनी केलेली गुंतवणूक वाया जाऊ नये, यासाठी आमदार सुधीर मुनगंटीवार यांनी पुढाकार घेत मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस आणि मत्स्यव्यवसाय मंत्री नितेश राणे यांच्याकडे विशेष आर्थिक मदत मंजूर करण्यासह बाधित तलावांचे चालू वर्षाचे भाडे पूर्णतः माफ करण्याची मागणी केली आहे. मत्स्यव्यवसायावर अवलंबून असलेल्या कुटुंबांना या आर्थिक संकटातून सावरण्यासाठी शासनाकडून ठोस मदत मिळावी, त्यांच्या कष्टाची आणि गुंतवणुकीची हानी भरून निघावी, यासाठी आ. सुधीर मुनगंटीवार यांनी मच्छीमार बांधवांच्या व्यथा शासनदरबारी मांडत त्यांच्या पाठीशी खंबीरपणे उभे राहण्याची भूमिका घेतली आहे.

चंद्रपूर जिल्ह्यात यंदा निर्माण झालेल्या दुष्काळसदृश परिस्थितीमुळे अनेक तलावांमधील पाण्याची पातळी खालावली आहे. मच्छीमार सहकारी संस्थांनी तलाव भाडेतत्त्वावर घेऊन त्यामध्ये मत्स्यबीज अर्थात बोटुकली सोडण्यासाठी तसेच माशांच्या संगोपनासाठी मोठी आर्थिक गुंतवणूक केली आहे. मात्र, पाणीसाठा कमी झाल्यामुळे मत्स्यसंवर्धन आणि उत्पादनावर विपरीत परिणाम झाला आहे. परिणामी, बोटुकली खरेदी, मत्स्यसंवर्धन आणि तलावभाड्यासाठी केलेला खर्च भरून काढणेही कठीण झाले आहे. उत्पन्न घटल्याने या संस्थांसह त्यांच्या सदस्यांच्या उदरनिर्वाहाचा प्रश्न गंभीर बनला आहे.

मत्स्यव्यवसाय करणाऱ्यांच्या अडचणींचा विचार करून शेतकऱ्यांप्रमाणे मदत मिळावी, अशी आग्रही भूमिका आमदार सुधीर मुनगंटीवार यांनी घेतली आहे.मत्स्यमारी करणाऱ्यांना शेतकऱ्यांचा दर्जा देण्याच्या शासन निर्णयाचा संदर्भ देत, नैसर्गिक परिस्थितीमुळे नुकसान झालेल्या मत्स्यव्यवसाय बांधवांना आर्थिक मदत व आवश्यक सवलती देण्यासाठी शासनाची तरतूद आहे. या तरतूदनुसार सकारात्मक आणि विशेष धोरणात्मक निर्णय घ्यावा, अशी मागणी आ.मुनगंटीवार यांनी केली आहे.

या मागणीच्या अनुषंगाने बाधित तलावांचे तातडीने सर्वेक्षण करून नुकसानीचे वस्तुनिष्ठ मूल्यांकन करावे, बोटुकली खरेदी व मत्स्यसंवर्धनासाठी केलेली गुंतवणूक आणि उत्पन्नातील घट विचारात घेऊन बाधित मच्छीमार सहकारी संस्था व त्यांच्या नोंदणीकृत सदस्यांना विशेष आर्थिक मदत मंजूर करावी, तसेच दुष्काळसदृश परिस्थितीमुळे बाधित तलावांचे चालू वर्षाचे भाडे पूर्णतः माफ करावे, अशी भूमिका आ.सुधीर मुनगंटीवार यांनी पत्रात मांडली आहे. याशिवाय, मदतीसाठी आवश्यक निधी उपलब्ध करून निर्णयाची अंमलबजावणी तातडीने करण्याची मागणीही करण्यात आली आहे.

नैसर्गिक संकटामुळे मच्छीमारांनी वर्षभराच्या उदरनिर्वाहासाठी केलेली मेहनत आणि गुंतवणूक धोक्यात आली असताना, त्यांना केवळ आश्वासनांवर अवलंबून राहावे लागू नये, तर प्रत्यक्ष आर्थिक मदत मिळावी, ही आमदार सुधीर मुनगंटीवार यांची भूमिका आहे. शेतकऱ्यांप्रमाणेच मत्स्यव्यवसाय बांधवांनाही संकटाच्या काळात शासनाचा भक्कम आधार मिळावा, त्यांच्या कुटुंबांचे आर्थिक स्थैर्य टिकून राहावे आणि मत्स्यव्यवसाय पुन्हा उभारी घेऊ शकेल, यासाठी त्यांनी मुख्यमंत्री आणि मत्स्यव्यवसाय मंत्र्यांकडे हा प्रश्न ठामपणे मांडला आहे.

महाराष्ट्र विधानसभा

# सुधीर मुनगंटीवार

विधानसभा सदस्य, बल्लारपूर, जि. चंद्रपूर

7722074199
Sudhir Mungantiwar
sudhir.mungantiwar
www.sudhirmungantiwar.com
@SMungantiwar.com
SudhirMungantiwar
sudhirbhau.mungantiwar@gmail.com
bjp03069@gmail.com

जावक क्रमांक : ४१४१/ऑक्टोबर/२५

दिनांक : १०.१०.२०२५

प्रति,

मा.श्री. देवेंद्रजी फडणवीस
मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य,
मंत्रालय, मुंबई.

सप्रेम वंदेमातरम्...!!

**विषय :** दुष्काळसदृश परिस्थितीमुळे मत्स्यव्यवसायाचे नुकसान झालेल्या मच्छीमार सहकारी संस्थांना व त्यांच्या नोंदणीकृत सदस्यांना आर्थिक मदत देऊन तलावांचे भाडे माफ करण्याबाबत.

**संदर्भ :** शासन निर्णय क्रमांक : मत्स्यवि २०२३/प्र.क्र. ०६/पदुम १३, दिनांक ०९/०५/२०२५.

महोदय,

चंद्रपूर जिल्ह्यात यावर्षी निर्माण झालेल्या दुष्काळसदृश परिस्थितीमुळे शेतीबरोबरच मत्स्यव्यवसायालाही मोठा फटका बसला आहे. जिल्ह्यातील अनेक तलावांमधील पाणीसाठा कमी झाल्याने मच्छीमार सहकारी संस्था व त्यांच्या नोंदणीकृत सदस्यांचे मोठ्या प्रमाणात आर्थिक नुकसान होत आहे.

मच्छीमार संस्थांनी तलाव भाडेतत्त्वावर घेऊन त्यामध्ये मत्स्यबीज (बोटुकली) टाकण्यासाठी मोठी आर्थिक गुंतवणूक केली आहे. मात्र, तलावांतील पाणी कमी झाल्यामुळे माशांचे संगोपन व उत्पादन प्रभावित झाले असून, बोटुकली खरेदी आणि मत्स्यसंवर्धनासाठी केलेला खर्चही भरून निघणे कठीण झाले आहे. परिणामी, अनेक मच्छीमार संस्थांचे उत्पन्न शून्याच्या जवळ आले असून, त्यांच्या उदरनिर्वाहाचा गंभीर प्रश्न निर्माण झाला आहे.

शासन निर्णय क्रमांक मत्स्यवि २०२३/प्र.क्र. ०६/पदुम १३, दिनांक ०९ मे २०२५ यानुसार मत्स्यमारी करणाऱ्यांना शेतकऱ्यांचा दर्जा देण्यात आलेला आहे. त्यामुळे दुष्काळसदृश परिस्थितीत नुकसान झालेल्या मच्छीमार समाजाच्या अडचणींचा सहानुभूतीपूर्वक विचार करून, शेतकऱ्यांप्रमाणेच त्यांनाही आर्थिक मदत देण्याबाबत शासनाने सकारात्मक निर्णय घेणे आवश्यक आहे.

१. चंद्रपूर जिल्ह्यातील दुष्काळसदृश परिस्थितीमुळे बाधित तलावांचे तातडीने सर्वेक्षण करून मच्छीमार सहकारी संस्थांच्या नुकसानीचे मूल्यांकन करण्यात यावे.

२. तलावांमध्ये टाकलेल्या बोटुकलीचा खर्च, मत्स्यसंवर्धनावरील गुंतवणूक आणि उत्पन्नातील घट विचारात घेऊन बाधित मच्छीमार सहकारी संस्थांना व त्यांच्या नोंदणीकृत सदस्यांना विशेष आर्थिक मदत मंजूर करण्यात यावी.



पत्ता :'भाग्यश्री' गोल बाजार वार्ड, चंद्रपूर (महाराष्ट्र) दूरध्वनी क्र. 07172-252582 (O), 256069 (H) 9552799608 (W)

महाराष्ट्र विधानसभा

सुधीर मुनगंटीवार

विधानसभा सदस्य, बल्लारपूर, जि. चंद्रपूर

7722074199
Sudhir Mungantiwar
sudhir mungantiwar
www.sudhirmungantiwar.com
@SMungantiwar.com
SudhirMungantiwar
sudhirbhau.mungantiwar@gmail.com

जावक क्रमांक :

दिनांक :

३. दुष्काळसदृश परिस्थिती लक्षात घेऊन बाधित तलावांचे चालू वर्षाचे भाडे पूर्णतः माफ करण्यात यावे.

४. मच्छीमारांना शेतकऱ्यांचा दर्जा देण्यासंदर्भातील उपरोक्त शासन निर्णयाच्या अनुषंगाने, नैसर्गिक परिस्थितीमुळे नुकसान झालेल्या मच्छीमार समाजाला शेतकऱ्यांप्रमाणे आर्थिक मदत व आवश्यक सवलती देण्यासाठी विशेष धोरणात्मक निर्णय घेण्यात यावा.

५. बाधित मच्छीमार कुटुंबांना आर्थिक संकटातून बाहेर काढण्यासाठी आवश्यक निधी उपलब्ध करून मदतीची अंमलबजावणी तातडीने करण्यात यावी.

मच्छीमार समाजाने मत्स्यव्यवसायासाठी केलेली गुंतवणूक नैसर्गिक परिस्थितीमुळे वाया जाण्याची वेळ आली आहे. अशा परिस्थितीत शासनाने त्यांना वाऱ्यावर न सोडता आर्थिक आधार देणे गरजेचे आहे. त्यामुळे वरील मागण्यांचा सहानुभूतीपूर्वक विचार करून मच्छीमार सहकारी संस्था व त्यांच्या नोंदणीकृत सदस्यांना आर्थिक मदत आणि तलावभाडे माफीबाबत सकारात्मक निर्णय घेण्यात यावे, ही विनंती.

आपला

(सुधीर मुनगंटीवार)

प्रतिलिपी

१. मा. जिल्हाधिकारी, चंद्रपूर
२. मा. सहाय्यक आयुक्त, मत्स्य व्यवसाय विभाग, चंद्रपूर
३. श्री. जितेंद्र टिंगूसले, अध्यक्ष, वाल्मिकी मत्स्य पालन सहकारी संस्था, मुल, जि. चंद्रपूर
✓४. श्री. बंडू मधुकर गौरकर सदस्य महाराष्ट्र राज्य कृषी मूल्य आयोग मुंबई
५. श्री. राकेश ठाकरे जिल्हामहामंत्री भाजपा युवा मोर्चा चंद्रपूर

।। वृक्ष लावा, वृक्ष जगवा ।।
पत्ता : 'भाग्यश्री' गोल बाजार वार्ड, चंद्रपूर (महाराष्ट्र) दूरध्वनी क्र. 07172-252582 (O), 256069 (H) 9552799608 (W)